IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal

Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# खेलो इंडिया स्पर्धा आणि क्रीडा क्षेत्रातील लोक सहभाग

**प्रा. डॉ. विजय यशवंत देशमुख**
क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक,
बाबुजी आव्हाड महाविद्यालय,पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर

**Article Info**

***Article History:***
Received: 17th January 2026
Accepted: 22nd January 2026
Published: 02nd February 2026

***Keywords:***

*खेलो इंडिया, लोकसहभाग, क्रीडा विकास, युवक, भारत*

**ABSTRACT**

भारत सरकारने सुरू केलेला खेलो इंडिया उपक्रम हा देशातील क्रीडा संस्कृती बळकट करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश तळागाळातील प्रतिभावान खेळाडूंना ओळख देणे, क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करणे आणि सर्वसामान्य लोकांमध्ये क्रीडेमधील सहभाग वाढवणे हा आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये खेलो इंडिया स्पर्धांचा क्रीडेमधील लोकसहभागावर झालेला परिणाम, शालेय-महाविद्यालयीन स्तरावरील सहभाग, ग्रामीण-शहरी क्रीडा विकास आणि सामाजिक आरोग्यावर होणारा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Deshmukh, V. Y. (2026). खेलो इंडिया स्पर्धा आणि क्रीडा क्षेत्रातील लोक सहभाग. IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 431–433.

१. प्रस्तावना -

क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासाचे प्रभावी माध्यम आहे. भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात क्रीडेमधील लोकसहभाग वाढवणे ही एक मोठी गरज आहे. याच पार्श्वभूमीवर २०१८ मध्ये भारत सरकारने खेलो इंडिया कार्यक्रमाची सुरुवात केली. खेलो इंडीया युथ गेम्स, खेलो इंडीया युनिवर्सिटी गेम्स, खेलो इंडीया विंटर गेम्स, महिलांसाठी अस्मिता खेलो इंडीया लीगचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांमुळे देशभरातील युवकांना स्पर्धात्मक खेळात सहभागी होण्याची संधी मिळते. देशभरात स्थापन करण्यात आलेली १००० पेक्षा अधिक खेलो इंडिया केंद्रे ही स्थानिक पातळीवर नियमित प्रशिक्षण आणि सरावाची सुविधा उपलब्ध करून देतात. या कार्यक्रमामुळे शालेय व महाविद्यालयीन स्तरावर क्रीडा संस्कृती निर्माण होण्यास चालना मिळाली आहे.

उद्दिष्टे -

१.१ क्रीडेमधील लोकसहभाग वाढवणे.

१.२ क्रीडा प्रतिभेची ओळख व विकास करणे.

१.३ क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण करणे.

१.४ महिला व दिव्यांग सहभाग वाढवणे.

१.५ फिटनेस व क्रीडा संस्कृती विकसित करणे.

२. खेलो इंडिया कार्यक्रमाची संकल्पना -

खेलो इंडिया हा युवक व्यवहार व क्रीडा मंत्रालयाचा प्रमुख उपक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत:

शालेय व महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. उदयोन्मुख खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे. क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण करणे. प्रशिक्षक व क्रीडा विज्ञानाचा वापर यावर भर देण्यात येतो.

३. क्रीडेमधील लोकसहभागाची संकल्पना -

लोकसहभाग म्हणजे समाजातील विविध घटकांचा यामध्ये विद्यार्थी, युवक, महिला, ग्रामीण व शहरी नागरिक यांचा क्रीडाक्रियांमध्ये सक्रिय सहभाग वाढल्यास नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. सामाजिक एकात्मता वाढते. युवकांमध्ये शिस्त व नेतृत्वगुण विकसित होतात.

४. खेलो इंडिया स्पर्धा व लोकसहभागावर परिणाम -

४.१ शालेय स्तरावरील सहभाग -

खेलो इंडिया शालेय स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडेबद्दल उत्साह निर्माण झाला आहे. नियमित सराव, स्पर्धा व प्रोत्साहनामुळे शाळांमधील क्रीडा सहभाग लक्षणीय वाढला आहे.

४.२ महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तर -

महाविद्यालयीन स्पर्धांमुळे युवकांना राष्ट्रीय पातळीवर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत आहे. यामुळे उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचाही क्रीडेकडे ओढा वाढला आहे.

४.३ ग्रामीण व शहरी सहभाग -

ग्रामीण भागात क्रीडा सुविधा मर्यादित असल्या तरी खेलो इंडिया अंतर्गत नवीन मैदाने, क्रीडा संकुले उभारली जात आहेत. यामुळे ग्रामीण युवकांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागातही स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले आहे. खेलो इंडिया केंद्रांमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील मुला-मुलींना क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धांची संधी मिळत आहे, ज्यामुळे सामाजिक समावेशनाला चालना मिळते.

४.४ युवक सहभागात वाढ -

अनेक अभ्यासांनुसार, ज्या भागात खेलो इंडिया कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येतो, त्या भागात युवकांचा क्रीडेमधील सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. काही जिल्हास्तरीय अभ्यासांमध्ये सुमारे ४०–४५% युवकांचा सहभाग आढळून आला आहे.

४.३ महिला व दिव्यांग सहभाग -

अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स लीग व दिव्यांगासाठी स्वतंत्र खेलो इंडिया गेम्स अशा महिला व दिव्यांग खेळाडूंसाठी स्वतंत्र योजना व स्पर्धा राबविल्यामुळे त्यांच्या सहभागात सकारात्मक वाढ झाली आहे.

५. खेलो इंडिया कार्यक्रमामुळे सामाजिक व आरोग्यविषयक परिणाम -
लठ्ठपणा व जीवनशैलीजन्य आजार कमी होण्यास मदत होते. मानसिक आरोग्य सुधारते.
व्यसनमुक्तीकडे तसेच सामाजिक समावेशनास चालना मिळते.

६. आव्हाने -
जरी खेलो इंडिया कार्यक्रम यशस्वी ठरत असला तरी काही खालील आव्हाने आहेत:
ग्रामीण भागातील सुविधा अपुरी असणे.
प्रशिक्षित प्रशिक्षकांची कमतरता.
सातत्यपूर्ण निधीची आवश्यकता.

७. निष्कर्ष -
खेलो इंडिया स्पर्धा या भारतातील क्रीडेमधील लोकसहभाग वाढवण्यासाठी प्रभावी ठरत आहेत. खेलो इंडिया कार्यक्रम हा भारतातील क्रीडा विकासासाठी एक प्रभावी धोरणात्मक उपक्रम आहे.  या कार्यक्रमामुळे तळागाळातील प्रतिभेला संधी मिळत असून आरोग्यदायी व क्रीडाप्रधान समाजनिर्मितीस चालना मिळत आहे. या कार्यक्रमामुळे क्रीडेमधील लोकसहभाग,युवक सशक्तीकरण, तंदुरुस्ती आणि क्रीडा संस्कृतीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे. योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणीद्वारे हा कार्यक्रम भारताला क्रीडाक्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम बनवू शकतो.

संदर्भ -

1. युवक व्यवहार व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार. खेलो इंडिया कार्यक्रम माहिती.
2. National Institute of Sports Studies (2019). Sports Participation in India.
3. Sharma, R. (2020). Sports Development and Youth Participation in India. New Delhi.